| | |
|---|---|
| MHLA050028482025 | **वि दि दावा क्र ११/२०२५.**<br>**फेरोज वि ईस्माईल** |

**निशाणी ०१ वरील आदेश**

१. निशाणी १७ वरील आदेश पहा.

२. तडजोड पूरसीस प्रमाणे दावा अंतिमतः निकाली काढणेत येतो.

३. तडजोड पुरसीस ही हुकूमनाम्याचा भाग राहील.

४. वादीस न्यायालयीन शुल्क परतावा नियमाप्रमाणे देण्यात यावा.

५. येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

स्वाक्षरीत/-

**(एस.एन. सरडे)**

**दि.०९/०६/२०२६** **दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अहमदपूर**

| | |
|---|---|
| MHLA050028482025 | **वि दि दावा क्र ११/२०२५.**<br>**फेरोज वि ईस्माईल** |

**<u>नि क्र १७ वरील आदेश</u>**

सदर कामी वादी व प्रतिवादी तसेच त्यांचे वकिल न्यायालयात हजर असून वादी, प्रतिवादींची ओळख त्यांचे वकिलांनी दिली आहे. या कामी दाखल तडजोड पुरसीस मधील मजकूर उभय पक्षांनी मान्य व कबूल केला आहे. दावा मिळकत ही दिनांक ०३/१२/१९८१ च्या नगर रचनाकार उस्मानाबाद यांच्या आदेशाने भुखंड म्हणून निर्देशीत आहे. या मिळकतीचे खरेदीपत्र वादी, प्रतिवादींचे वडिल श्री सय्यद चांद अब्दूल रज्ञाक यांनी ही मिळकत ज्ञानोबा नरसिंगराव घोगरे यांच्याकडून विकत घेतली. सदर मिळकत पुढे १/२ स्वरुपात वादी, प्रतिवादीचे चुलते शमशुददीन अब्दूल रजजाक सय्यद व उर्वरीत १/२ मिळकत प्रतिवादी इस्माईल याला तोंडी हिबानाम्याने दिली. प्रतिवादी याने ती मिळकत वादीला सन २०२५ च्या ईद उल अझा या दिवशी तोंडी हिब्बाने दिली. सदर हिब्बा वादीने स्वीकारला असून त्या मिळकतीवर वादीचा कब्जा आहे. वादीने आवश्यक ते न्यायालयीन शुल्क भरलेले आहे. वादी, प्रतिवादींनी तडजोड पुरसीस मधील मजकूर मान्य व कबूल केला असल्याने ती वाचून दाखल करण्यात येते.

स्वाक्षरीत/-

**(एस.एन. सरडे)**

**दि.०९/०६/२०२६** **दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अहमदपूर**